# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### सातारा जिल्ह्यात गुन्हेगारीत वाढ झाल्याबाबत

**(१) ३०४ (२२-०४-२०२५) श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात मागील आठ महिन्यांमध्ये ३३ खून, दरोडे, जबरी चोरी, घरफोडी आदीमध्ये वाढ झाली असून गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने गुन्हेगारीला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०२५) :** (१) सातारा जिल्ह्यात माहे जानेवारी, २०२५ च्या मागील आठ महिन्यांमध्ये एकूण गुन्ह्यांमध्ये तुलना करता १०५ ने घट झाली आहे. तथापि, खुनाचे एकूण ३३ गुन्हे दाखल असून खुन, जबरी चोरी व घरफोडी या शिर्षकांखाली वाढ झाल्याचे व दरोडे या शिर्षकाखाली घट झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशीअंती निष्पन्न गुन्हेगारांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

घरफोडी गुन्ह्यांची पध्दत पाहता (Method) “mob” चे गुन्हे करणारे गुन्हेगार जेलमधुन सुटुन सध्या बाहेर कोणत्या ठिकाणी कार्यशील आहेत याची माहिती घेवुन अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांना चेक करुन त्यांच्याकडुन माहिती मिळवुन गुन्हे करण्याऱ्यांवर योग्य कारवाई केली जात आहे.

तसेच पॅरोलवर असणाऱ्या आरोपींना सुध्दा चेक करुन कारवाई केली जात आहे व रात्रगस्त दरम्याने रेकॉर्डवरील गुन्हेगारांच्या हालचालींची पडताळणी केली जात आहे तसेच संशयीत वाहने व इसमांची चौकशी करुन प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे

(३) विलंब नाही.

---

## मुंबईतील शिवडी येथे एका कंपनीच्या मातीभरणीच्या कामामुळे प्रदूषण होत असल्याबाबत

**(२) ५१२ (२३-०४-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवडी (मुंबई) येथील हाजी बंदर येथे असलेल्या एका कंपनीमध्ये माहे ऑक्टोबर २०२४ पासून मोठ्या प्रमाणात मातीभरणीचे काम सुरू असल्यामुळे सदर परिसरातील स्थानिक रहिवाशांना प्रदूषणामुळे श्वसनाचा त्रास होत असल्याने स्थानिक रहिवाशांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे याबाबत माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित कंपनीविरोधात शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०९-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रश्नाधीन परिसराची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १७/१२/२०२४ रोजी दिलेल्या भेटी दरम्यान आढळुन आलेला त्रुटींच्या अनुषंगाने मे. मुंबई पोर्ट ट्रस्टला दिनांक १७/०२/२०२५ रोजी हवा प्रदूषण नियंत्रणासाठी ७ दिवसात आवश्यक उपाययोजना करण्याबाबत आदेश देण्यात आले. सदर आदेशास अनुसरून दिनांक १३/०६/२०२५ रोजी उद्योगाची सूनावणी घेऊन रुपये १.०० लक्षची बँक हमी जप्त करुन दिनांक १७/०६/२०२५ रोजी अंतरीम आदेश देण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांचे सुपर स्पेशालिटी रुग्णालयात रुपांतरण करण्याबाबत

**(३) ५८८ (२४-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेली सर्व शासकीय रुग्णालये सुपर स्पेशालिटी रुग्णालयात रुपांतरण करण्याबाबतची ग्वाही मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी माहे डिसेंबर, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास घेतलेल्या आढावा बैठकीत दिली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला दर्जेदार आरोग्य सेवा व इतर सोयी सुविधा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०३-१०-२०२५) :** (१) व (२) राज्यातील वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय रुग्णालयाचे अतिविशेषोपचार रुग्णालयामध्ये रुपांतरण करण्याची बाब, रुग्णांना व जनतेला दर्जेदार आरोग्य सेवा व इतर सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्या याअनुषंगाने शासन विचाराधीन आहे.

(३) लागू नाही

---

## राज्यातील बांधकाम कामगारांना देण्यात येत असलेल्या सोयी सुविधांबाबत

**(४) ९७२ (२४-०४-२०२५) श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सद्य:स्थितीत किती नोंदणीकृत बांधकाम कामगारांची संख्या आहे तसेच सदर कामगारांना शासनामार्फत कोणत्या सुविधा देण्यात येत आहेत व आतापर्यंत सदर बांधकाम मजुरांवर किती खर्च करण्यात आला आहे,

(२) असल्यास, राज्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांव्यतिरिक्त बनावट कामगारांना सोयी सुविधा देण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीच्या अनुषंगाने दोषींबर कोणती कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (०१-१०-२०२५) :** (१) इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली असून मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.

दिनांक २१/०८/२०२५ अखेर ६९,३३,९२७ इतक्या बांधकाम कामगारांची मंडळाकडे एकूण नोंदणी झाली असून यापैकी ३९,०२,५३५ इतक्या बांधकाम कामगारांची नोंदणी सक्रिय आहे.

मंडळाकडून नोंदीत बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजनातर्गत शैक्षणिक सहाय्य योजना, आरोग्य सहाय्य योजना, आर्थिक सहाय्य योजना, सामाजिक सुरक्षा योजना राबविण्यात येतात.

मंडळाकडून माहे जून २०२५ अखेर रुपये २०,३७४.६६ कोटी इतकी रक्कम विविध योजनांच्या अंमलबजावणीकरीता मंडळामार्फत खर्च करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

मंडळाकडे नोंदणीसाठी संबंधित बांधकाम कामगारास मागील वर्षभरात त्याने किमान ९० दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केल्याचे प्रमाणपत्र मंडळाच्या IWBMS प्रणालीवर ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करताना अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

नोंदणी अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केलेनंतर निकषांची पूर्तता करणाऱ्या बांधकाम कामगारांचेच संबंधित नोंदणी अधिकाऱ्यांमार्फत अर्ज मंजूर केले जातात व त्यानुसार नोंदणी झालेल्या पात्र बांधकाम कामगारांना मंडळाच्या विविध योजनेचे लाभ दिले जातात.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असल्याबाबत

**(५) १४३० (२३-०४-२०२५) श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात भर दिवसा गोळीबार, गटागटात हाणामारी, गॅगवॉर आदी प्रकार वाढू लागले असून करंजे (सातारा) येथे सार्वजनिक जागेत कोयता घेऊन दोन गटात झालेली मारहाण तसेच कोंडवे येथे ३१ गुंठे जागेसाठी महागाव व बारबालांच्या कार्यक्रमाच्या घटनेनंतर झालेला गोळीबार आदी घटना घडत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातारा जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून वाढत्या गुन्हेगारीवर अंकुश बसविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सातारा जिल्ह्यात भर दिवसा गोळीबार, गटागटात हाणामारी, गँगवार याप्रकारच्या गुन्ह्याच्या शिर्षाखाली माहे जानेवारी, २०२५ दरम्यान खालीलप्रमाणे जिल्ह्यातील दोन वेगवेगळया पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.
१. मेंढा पोलीस ठाणे येथे दिनांक १२/१२/२०२४ रोजी गु.र.नं. २०३/२०२४, भा.न्या.सं. २०२३ चे कलम १०९, ११७(२) (३)(४), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), ३२४(४), १८९(२), १९१(२)(३), १९०
२. सातारा तालुका पोलीस ठोणे येथे गु.र.नं. २८/२०२५ भा.न्या.सं. कलम १०९, ३५१(२)(३), १११(३)(४), ३(५), शस्त्र अधि. ३, २५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच करंजे (सातारा) येथे सार्वजनिक जागेत फिर्यादी व त्याचा चुलत भाऊ व मित्र हे झेंडा चौक, करंजे येथे थांबलेले असताना तीन विधी संघर्षीत बालक यांनी शाळेतील जुन्या भांडणाचा राग मनात धरुन कोयत्याने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या कोपऱ्यावर मारले व शिवगाळ करुन पळुन गेले या घटनेसंदर्भात शाहुपुरी पोलीस ठाणे येथे दिनांक २१/०४/२०२५ रोजी गु.र.नं. १२६/२०२५ भा.न्या.सं. ११८(१), ३५१(२)(३), ३५२, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरचा गुन्हा तपासावर आहे.

तद्नंतर दिनांक २१/०४/२०२५ रोजी करंजे ता.जि.सातारा येथील विडा पान शॉप समोर तीन इसमांनी गाडीवरुन जात असताना मोठमोठ्याने आरडाओरड करत हातात गोल आकाराचे लोखंडी चक्र त्याला करवती सारख्या दातऱ्या असलेले शस्त्र व धारधार सुरी हातात घेऊन दहशत माजवित निघाले असल्याचे खबरीवरुन पोलीसांनी फिर्यादी होऊन दिनांक २२/०४/२०२५ रोजी शाहुपुरी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १२७/२०२५ आर्म अॅक्ट ४, २५, भा.न्या.सं. ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोंढवे येथे ३१ गुंठे जागेसाठी या मुदयाच्या अनुषंगाने कोणतीही तक्रार अथवा गुन्हा पोलीस घटकात नोंदविण्यात आलेला नाही.

तथापि, महागांव ता.जि.सातारा येथे शेत जमीनीच्या वादातुन फिर्यादीस घाबरविण्यासाठी आरोपी विजयसिंह जाधव याने जवळ असलेल्या परवानाधारक बंदुकीतुन हवेत एक गोळी झाडली सदर घटनेसंदर्भात दिनांक २२/०१/२०२५ रोजी सातारा शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ६१/२०२५, भा.न्या.सं. ११८(१), १२६(२), १२७(२), ३२९(१)(३), ३५२, ३५१ शस्त्र अधि. ३० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दिनांक १९/०३/२०२५ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(२) उपरोक्त प्रमाणे नमुद घटनांच्या अनुषंगाने तात्काळ गुन्हे दाखल करुन गुन्हेगारांवर वचक राहण्याकरीता योग्य ती परीणामकारक कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. तसेच पायी पेट्रोलिंग, परिणामकारक रात्रगस्त तसेच प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी येथील स्थानिक गुन्हे शाखा अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याबाबत

**(६) १७२४ (२४-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या निलंबित पोलीस निरीक्षकांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणे तसेच त्यांच्या बेहिशोबी मालमत्तेची चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक २२/०१/२०२५ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने, पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ३०/०१/२०२५ रोजीच्या ज्ञापनान्वये पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांना पोलीस निरीक्षक श्री.अशोक घोरबांड यांच्यावर सदोष मनुष्य वधाच्या गुन्ह्याबाबतची चौकशी करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच पोलीस निरीक्षक श्री.अशोक घोरबांड यांच्याकडील बेहिशोबी मालमत्तेची चौकशी करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल देखील महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडुन मागविला आहे. सदरचे दोन्ही अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) येथील स्थानिक रहिवाशांना धमकावून जमीन बळकाविल्याबाबत

**(७) २१०५ (२३-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (पूर्व)(जि.पालघर) येथे मुंबईतील एका महिलेने स्थानिक राहिवाशांच्या मोकळ्या जमिनींवर अनधिकृत बांधकामे करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिलने वसई (पूर्व) (जि.पालघर) येथील मोकळ्या जागेवर "पोलीस ठाणे वालीव" असा अनधिकृत फलक लावून स्थानिक रहिवाशांना धमकावत त्यांच्या जमिनी बळकविल्याप्रकरणी तेथील स्थानिक रहिवाशांनी पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने गरीब स्थानिक राहिवाशांच्या जमिनी बळकावणाऱ्या सदर महिलेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (३०-०९-२०२५) :** (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे. सदर प्रकरणाच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, वसई, मि.भा.व.वि. यांचेकडे दिनांक २८/११/२०२४ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.
(३) सदर प्रकरणाबाबत अर्जदार व गैरअर्जदार महिला यांच्या एकमेकांशेजारी जागा असून सदर जागेबाबत त्यांच्यात वाद चालू असल्यामुळे त्यांनी परस्परविरोधी तक्रार अर्ज दाखल केले आहेत.

सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार यांना चौकशी करीता हजर राहण्याबाबत वेळोवेळी कळविण्यात आले असता चौकशीसाठी हजर राहिले नाहीत. त्यामुळे त्यांचा तक्रार अर्ज दफ्तरी दाखल करण्यात आला असून याबाबत अर्जदार यांना दिनांक ११/०१/२०२५ रोजी समजपत्र देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमधील विस्तार अधिकारी व ग्रामसेवकांची पदे वाढविण्याबाबत

**(८) २२९२ (०९-०७-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एकूण २७,९५१ ग्रामपंचायती कार्यरत असून प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक ग्रामसेवक अपेक्षित असताना अनेक ठिकाणी दोन ते तीन गावांसाठी एकच ग्रामसेवक कार्यरत असल्यामुळे ग्रामसेवकांवर असणारा अतिरिक्त कामाचा ताण वाढून त्यांना प्रशासकीय जबाबदाऱ्या वेळेत पार पाडणे कठीण जात असल्याने ग्रामपंचायतींच्या नियमित कामकाजावर विपरीत परिणाम होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विस्तार अधिकाऱ्यांची संख्या अपुरी असल्यामुळे एका अधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात अनेक गावांचा समावेश होतो व त्यामुळे ग्रामसेवकांवरील देखरेख व मार्गदर्शनाची गुणवत्ता कमी होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व ग्रामसेवकांची संख्या वाढविणे, रिक्त पदांची भरती करणे तसेच विस्तार अधिकाऱ्यांचे कार्यक्षेत्रामध्ये सुसुत्रता आणणे सुसूत्रीत आणणे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२१-०८-२०२५) :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी यांचा सुधारित आकृतिबंध तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार विस्तार अधिकारी (पंचायत) या पदाचाही आकृतिबंध सुधारित करण्यात येत आहे.

(३) जिल्हा परिषद गट-क सरळसेवा पदभरती, २०२३-२४ प्रक्रिया ग्रामविकास विभागाकडून राबविण्यात आली आहे. माहे जून, २०२५ अखेर १५५२ पात्र कंत्राटी ग्रामसेवकांना उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. तसेच विस्तार अधिकारी (पंचायत) या पदाचा आकृतिबंध सुधारित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील सातरस्ता येथील आर.एम.सी. प्लांटवर कारवाई करण्याबाबत

**(९) २३८१ (१८-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील प्रदुषणात भर घालणाऱ्या आणि नियमांचे पालन न करणाऱ्या सातरस्ता येथील पिरामल रिअल्टी, वरळी येथील बॉम्बे डाभादेवी येथील स्कायवे या आर.एम.सी. प्लांटवर कारवाई करण्याची मागणी मा.पर्यावरण मंत्री महोदय, तसेच सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनात केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने सदरहू प्रदुषणकारी आर.एम.सी. प्लांटची तपासणी केली आहे काय, तपासणीत काय आढळून आले आणि सदरहू प्रदुषणकारी आर.एम.सी. प्लांटवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१०-२०२५) :** (१) हे खरे आहे.
श्री.सुनिल शिंदे, विधानपरिषद सदस्य यांच्या दिनांक २० मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये दक्षिण मुंबई परिसरातील आर.एम.सी. प्लांटमुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार प्राप्त झाली होती.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने माहे, एप्रिल २०२५ मध्ये आर.एम.सी. प्लांटची पाहणी केली. पाहणी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक २७/११/२०२४ रोजीच्या सुधारीत नियमावलीच्या पुर्ततच्या अनुषंगाने सदर आर.एम.सी. उद्योगांची दिनांक २९/०९/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली असून याबाबत कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेत स्थायी समितीच्या मान्यतेपूर्वीच टेलिफोन वायरिंगची कामे केल्याबाबत

**(१०) २६१५ (१८-०७-२०२५) श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीने मान्यता देण्यापूर्वी आणि कामाचा कार्यादेश देण्यापूर्वीच पुणे महानगरपालिका भवनातील व सावरकर भवनातील टेलिफोन वायरिंगची कामे केल्याची बाब माहे

मार्च,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या कामांचा ठेका देताना ठेकेदारांनी भरलेल्या निविदांमध्ये त्रुटी काढून त्या रद्द केल्या जातात आणि हवे त्या ठेकेदाराला काम दिले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, टेलिफोन वायरिंग चे बिल काढण्यासाठी संबंधित विभागातील अधिकारी प्रयत्नशील आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,शासनाने उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-०९-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
सदर कामाची जाहीर निविदा मागवून, प्राप्त निविदेतील कमी दराची निविदा स्थायी समितीला सादर करुन स्थायी समितीच्या ठराव क्र.२१२०, दिनांक २८/०३/२०२५ ने मान्यता मिळाल्यानंतर दिनांक ०६/०५/२०२५ रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील सागरी सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याबाबत

**(११) २६५० (१८-०७-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील सागरी सुरक्षा तपासणी दरम्यान चारपैकी तीन स्पीड बोटी नादुरुस्त असल्याने सागरी सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असल्याची बाब माहे एप्रिल-२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काश्मीरमधील पहलगाम हल्लानंतर सागरी सुरक्षेचा प्रश्न पुन्हा गंभीर झाल्याने याप्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०२५) :** (१) पालघर जिल्ह्यात केंद्र शासनाकडून ०२ व राज्य शासनाकडून ०२ अशा एकूण चार शासकीय नौका प्राप्त आहेत. सदर नौका या १४ ते १५ वर्ष जुन्या असल्याने त्यांचे नादुरूस्तीचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे राज्य शासनाकडून प्राप्त असलेल्या दोन नौकांना आधुनिकीकरण्यासाठी (दुरुस्तीसाठी) पाठविण्याची प्रक्रीया चालु होती. तसेच केंद्र शासनाकडून प्राप्त दोन नौकांपैकी एका नौका देखभाल दुरुस्ती कराराअभावी बंद असल्याने पालघर जिल्ह्यात एप्रिल, २०२५ मध्ये एका नौकेद्वारे सागर गस्त राबविणेत आली आहे.
(२)(३) काश्मिर मधील पहलगाम हल्ल्यानंतर सुरक्षेची बाब म्हणून दिनांक १०/०५/२०२५ रोजी पासून पालघर जिल्ह्यात भाडेतत्वावरील चार खाजगी ट्रॉलर्स तसेच एका शासकीय बोटीद्वारे रात्री-दिवस पोकळविरहित सागर गस्त राबविणेत आली.

तसेच पालघर जिल्ह्यातील एकूण चार नौका पैकी राज्य शासनाकडून प्राप्त असलेल्या दोन शासकीय बोटी या आधुनिकीकरणासाठी (दुरुस्तीसाठी) मे.औशन ब्लु.प्रा.लि.यांचेकडे धरमतर येथील यार्ड मध्ये पाठविण्यात आल्या आहेत व सदर नौकांचे दुरुस्तीचे काम प्रगती पथावर असून त्या लवकरच सागरी गस्तीकरीता पोलीस दलात तैनात होणार आहेत.

तसेच केंद्र शासनाकडून प्राप्त दोन नौका पैकी एक नौका चालु असून एक नौका ही देखभाल दुरुस्ती करारा अभावी बंद आहे. सदर नौकांचा देखभाल व दुरूस्ती करार होणेबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## राज्यात डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया उपचाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१२) २६५७ (१०-०७-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शहरी भागातील मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनियाचे सर्वाधिक रुग्ण मुंबई महानगरपालिका क्षेत्रात असून मागील तीन महिन्यात मलेरियाचे १,१३८ रुग्ण, डेंग्यूचे ८१२ तर चिकनगुनियाचे ५०७ रुग्ण आढळले असल्याचे माहे एप्रिल २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत माहिती घेवून या रुग्णांवर योग्य उपचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (१४-१०-२०२५) :** (१) हे खरे आहे.

राज्यात तसेच, शहरी भागात माहे जानेवारी ते मार्च २०२५ दरम्यान रुग्णांची माहिती

| आजार | एकूण रुग्ण (राज्यातील) | एकूण रुग्ण (म.न.पा.क्षेत्र) | शहरी भागातील रुग्णांचे प्रमाण (% मध्ये) |
|---|---|---|---|
| हिवताप | २०९७ | १२८५ | ६१.२८ |
| डेंग्यू | ११५९ | ५६६ | ४८.८४ |
| चिकुनगुनिया | ५९२ | २५२ | ४२.५७ |

(२) रुग्णांवर नियमितपणे उपचार केले जातात.

राज्यातील मागील तीन महिन्यांतील (जाने ते मार्च २०२५ ) कार्यवाहीची माहिती खालीलप्रमाणे

| आजार | तपासलेले रक्तनमुने /रक्तजल नमुने | बाधित रुग्ण | एकूण समुळ उपचार दिलेले रुग्ण |
|---|---|---|---|
| हिवताप | ५३९५४४० | २०९७ | २०५१ |
| डेंग्यू | १९००२ | ११५९ | लक्षणांनुसार उपचार करण्यात येतो |
| चिकुनगुनिया | ९१०९ | ५९२ | |

प्रत्येक शासकीय आरोग्य संस्थेत हिवतापाकरीता रक्तनमुने तपासणी केली जाते. आशा व आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी जाऊन जलद ताप रुग्ण सर्वेक्षण करण्यात येते. सर्वेक्षणांतर्गत ताप रूग्णांचे संकलित केलेले रक्तनमुने तपासणीअंती बाधित आढळून आलेल्या रूग्णांना समूळ उपचार समक्ष रुग्णांचे ठिकाणी जाऊन खाऊ घातला जातो. तसेच राज्यामध्ये हिवतापासाठी चाचणी व गंभीर रूग्णांच्या उपचार, व्यवस्थापनेकरीता ८९ सेंटीनल सेंटर्स (प्रयोगशाळा) कार्यान्वित आहेत.

हिवतापाची रक्तनमुना चाचणी अंती, निदान अदूषित आढळुन आल्यास त्या रूग्णाची डेंग्यू/ चिकुनगुनिया निदानाकरीता रक्तजल नमुने सेंटीनल सेंटर्स (प्रयोगशाळा) येथे तपासणी करीता पाठविले जातात. राज्यामध्ये डेंग्यू/ चिकुनगुनियाच्या चाचणी व गंभीर रूग्णांच्या उपचार,व्यवस्थापनेकरीता करीता ५० सेंटीनल सेंटर्स (प्रयोगशाळा) कार्यान्वित आहेत. डेंग्यू/ चिकुनगुनियाचे बाधित रूग्णांवर लक्षणानुसार उपचार करण्यात येतो.

राज्यातील डेंग्यू आजारामुळे होणारे मृत्यूचे प्रमाण कमी करणेसाठी डेंग्यू रूग्ण व्यवस्थापन व उपचार (Clinical Management) पध्दतीचे ५०३ वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. भिषक (फिजीशियन), बालरोग तज्ञ यांना प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (Clinical Management TOT) देण्यात आले आहे.या प्रशिक्षकांनी त्यांचे विभागातील वैद्यकिय अधिकारी व रुग्णालयीन कर्मचारी यांना प्रशिक्षित केले आहे.

किटकजन्य आजारांचे शहरी भागामध्ये प्रमाण जास्त असल्याने राज्यातील १३ महानगरपालिकांना सर्वेक्षणासाठी ब्रीडिंग चेकर्सच्या माध्यमातून मनुष्यबळ पुरवठा केला गेला.

या कार्यालयामार्फत किटकजन्य आजारांचे रुग्णसंख्येत वाढ झालेल्या जिल्ह्यांना तसेच मनपा यांना दर आठवड्याला पत्राद्वारे वाढ निदर्शनास आणून देऊन जिल्हा स्तरावरून जिल्हा हिवताप अधिकाऱ्यांमार्फत संनियंत्रण करून उपाययोजनाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेविषयी सूचित केले जाते तसेच या कार्यालयाकडून त्रैमासिक आढावा सभेचे आयोजन, दूरभाषाप्रणाली व्दारे होणाऱ्या नियमित बैठका, आठवडा अहवालाव्दारे नियमित आढावा घेऊन रुग्ण वाढ नियंत्रणात ठेवणेविषयी कळविले जाते. तसेच IHIP पोर्टरवरील माहितीचा देखील नियमित आढावा घेतला जातो.

साथरोगाच्या अनुषंगाने मा.आरोग्य मंत्री महोदय यांनी वेळोवेळी आढावा बैठक घेऊन मार्गदर्शन केले आहे.

किटकजन्य आजारांच्या प्रतिबंध व नियंत्रणाकरीता महत्वपूर्ण शासन निर्णय-

किटकजन्य आजारांचे सनियंत्रण करताना आंतरविभागीय समन्वय साधून,सर्व विभागांचा सहभाग

प्राप्त करून घेऊन साथरोगांचा प्रतिबंध करण्याकरीता महाराष्ट्रात संसर्गजन्य आजारांबाबत अभ्यास करुन प्रभावी प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजना महाराष्ट्र राज्य संसर्गजन्य आजार प्रतिबंध व नियंत्रण उच्चस्तरिय समिती करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये चिकुनगुनिया आणि डेंग्यू प्रादुर्भाव सनियंत्रित करणेसाठी उपाययोजना करणेबाबत शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

किटकजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी खालील उपाययोजना राबविल्या जातात -

१) आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी जाऊन जलद ताप रुग्ण सर्वेक्षण करण्यात येते.

२) दुर्गम व अतिदुर्गम भागात हिवतापाच्या तात्काळ निदानासाठी रॅपिड डायग्नोस्टीक टेस्ट किट्स द्वारे तपासणी करण्यात येते.

३) डास नियंत्रणासाठी आरोग्य कर्मचारी यांचे मार्फत प्रभावी एकात्मिक किटकशास्त्रीय सर्वेक्षण नियमित करण्यात येते.

४) किटकजन्य आजारांचा प्रसार डासांच्या मादीमुळे होत असल्याने, डासांची पैदास साठलेल्या व साठवलेल्या स्वच्छ पाण्याचे साठ्यांमध्ये होते. त्याकरीता साठलेल्या व साठवलेल्या स्वच्छ पाण्याचे साठे रिकामे करणे, झाकून ठेवणे तसेच पाणी वाहते करणे, आठवड्यातील एक कोरडा दिवस ठरवून त्या दिवशी पाणी साठवणूकीची भांडी रिकामी करुन, आतून घासून-पुसून, कोरडी करणे या उपाययोजना केल्या जातात.

५) किटकनाशकांमुळे होणाऱ्या प्रदूषणाचा विचार करुन राज्यामध्ये योग्य डासोत्पत्ती स्थानांमध्ये डास अळीभक्षक गप्पीमासे सोडण्यात येतात.सदर उपाययोजना ग्रामीण तसेच शहरी भागातही राबविण्यात येते.

६) दरवर्षी जागतिक हिवताप दिन (२५ एप्रिल) आणि राष्ट्रीय डेंग्यु दिन (१६ मे) तसेच जून महिना "हिवताप प्रतिरोध महिना"व जुलै महिना "डेंग्यू प्रतिरोध महिना" विविध उपक्रम घेऊन साजरा केला जातो.

७) शालेय आरोग्य शिक्षणांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना डासआळी प्रात्यक्षिक दाखवून त्या नष्ट करावयाचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच प्रभात फेरी, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा अश्या उपक्रमांव्दारे डेंग्यूची जनजागृती केली जाते तसेच उपाययोजनांची अंमलबजावणी करणेसाठी जनतेला आरोग्य शिक्षण देण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये पाळणाघर उपलब्ध करुन देणेबाबत

**(१३) २७४८ (१०-०७-२०२५) श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मातृत्व लाभ (सुधारणा) अधिनियम, २०१७ नुसार ५० किंवा त्याहून अधिक महिलांचा कर्मचारी वर्ग असलेल्या कार्यालयांमध्ये पाळणाघर सेवा अनिवार्य असताना अनेक कार्यालयांमध्ये या सुविधा प्रत्यक्षात उपलब्ध झालेल्या नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शासकीय, निमशासकीय व खाजगी कार्यालयांमध्ये ५० किंवा त्याहून अधिक महिला कर्मचारी कार्यरत आहेत अशा कार्यालयांमध्ये पाळणाघर सुविधा प्रत्यक्षात उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२९-०९-२०२५) :** (१), (२) व (३) राज्यात सेवा/ महामंडळ /कंपन्या/ विद्यापीठे/रुग्णालये/केअर सर्व्हीस प्रोव्हायडर/ शासकीय संस्था/ अशासकीय संस्था इत्यादी यांना पाळणाघर सुरु करण्यासंदर्भात शासन परिपत्रक दिनांक २६/०६/२०२५ अन्वये केंद्र शासनाने विहित केलेली राष्ट्रीय किमान मानके व नियमावलीनुसार कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार पाळणाघरासंदर्भात सदर मार्गदर्शक सूचनांमधील अटी शर्ती लागु राहतील.

---

## राज्यातील १५१३ दूध संस्थाअवसायात जावून १४१ संस्था दूध पुरवठ्या अभावी बंद कराव्या लागत असल्याबाबत

**(१४) ३०१२ (१७-०७-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १५१३ प्राथमिक दूध उत्पादक संस्था बंद पडण्याच्या मार्गावर असून ३६ जिल्हयांमध्ये १२ हजार ३६६ संस्था चालू स्थितीत असून त्यापैकी १४१ संस्था बंद असल्याचे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक सहकारी दूध संस्थेची नोंदणी जिल्हास्तरीय सहकारी दूध संस्थेकडे करण्यात येते त्याबाबतची अट पूर्ण झाल्यावर काही संस्थांच्या नावाने बँकांसह अन्य वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन ते सभासद शेतकऱ्यांना गाय किंवा म्हैस घेण्यासाठी पैशाचे वाटप करित असल्यामुळे दूधाचे संकलन वाढण्यास मदत होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहकारी संस्थांमध्ये वाढलेल्या अनागोंदी कारभारामुळे अनेक प्राथमिक संस्था बंद होत असल्याचे तसेच तालुका व जिल्हा दूध संघाची दुरावस्था होत असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्राथमिक सहकारी दूध संस्था व तालुका व जिल्हास्तरीय संस्था वाचविण्याचे दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (३०-०९-२०२५) :** (१) (२) (३) (४) व (५) महाराष्ट्र राज्यात एकूण १२३६६ प्राथमिक सहकारी दूध संस्था कार्यरत असून १४१ संस्था बंद व १५१३ प्राथमिक सहकारी दूध संस्था अवसायनात आहेत व एकूण ५४ तालुका सहकारी दूध संघ कार्यरत असून व १२ तालुका सहकारी दूध संघ अवसायनात आहेत. तसेच एकूण १६ सहकारी जिल्हा दूध संघ कार्यरत असून १ जिल्हा सहकारी दूध संघ बंद आहे. तसेच ७ जिल्हा सहकारी दूध संघ अवसायनात आहेत.

प्राथमिक सहकारी दूध संस्थांची नोंदणी ही जिल्हास्तरीय सहकारी दूध संस्थेकडे करण्यात येत नसून ती जिल्हास्तरीय सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) या कार्यालयाकडून होते. शासन निर्णय दिनांक ४/०१/२००० मधील अटी व शर्तीनुसार नियोजित संस्थेने दूध संकलनाची अट पूर्ण केल्यानंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ मधील तरतुदीनुसार करण्यात येऊन गावात नविन दूध संस्था नोंदणीबाबत निकष ठरविण्यात आलेले आहेत.

---

## विदर्भात वीज केंद्रातून होणाऱ्या प्रदूषणाबाबत

**(१५) ३३३९ (१७-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक ५२८ ला दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात वीज केंद्रातून होणाऱ्या प्रदूषणाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्या न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली असून त्यानुषंगाने महाऔष्णिक वीज निर्मिती केंद्राच्या प्रदूषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने काय कारवाई केली तसेच आहे यासंदर्भातील प्रतिज्ञापत्र तीन आठवड्यात दाखल करण्याचे निर्देश मा.सर्वोच्च न्यायालयाने माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय हरित लवादाद्वारे देण्यात आलेल्या निर्देशावर आतापर्यंत काय कारवाई करण्यात आली आहे याचे उत्तर तीन आठवड्यात प्रदूषण नियंत्रण मंडळाला मागितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सीटीपीएसने प्रदूषणासंदर्भात दिलेल्या निर्णयांचे आणि आदेशांचे किती प्रमाणात पालन केले जाते हे सांगणारे प्रतिज्ञापत्र माहे जुलै महिन्यापर्यंत सादर करावे व सन २०२२ मध्ये प्रदूषणाबाबत वीज केंद्राला ५ कोटी रुपयांचा दंड ठोठावला त्याची रक्कम प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे जमा करण्याचे निर्देश मा.न्यायालयाने राष्ट्रीय हरित लवादातर्फे गठीत संयुक्त समितीला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चंद्रपूर औष्णिक वीज प्रकल्पातून होणारे प्रदूषण आणि त्याचा शहरातील रहिवाशांच्या आरोग्यावर होणारा परिणाम यावर हरित लवादाने प्रदूषण नियंत्रणासाठी सुचविलेल्या उपाययोजना अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी आणि वीज केंद्रामुळे होणारे प्रदूषणाचे सार्वजनिक आरोग्यावर होणारा गंभीर परिणामाचा अभ्यास करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने समिती गठीत करावी अशी सूचना मा.न्यायालयाने दिल्या असून यासंदर्भात मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे शासनाने व संबंधित विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१०-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ३०/०४/२०२५ रोजीच्या आदेशानूसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास तीन आठवड्यात प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे यांच्या दिनांक १९/०१/२०२२ रोजीच्या आदेशानुसार चंद्रपूर औष्णिक वीज प्रकल्प केंद्राने रुपये ५.०० कोटी इतकी रक्कम अंतरिम भरपाई दिनांक १७/०२/२०२२ रोजी जमा केली आहे.

(४) मा.राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांच्या दिनांक १९/०१/२०२२ रोजीच्या आदेशानूसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पत्र क्रं. MPCB/JD(APC)/B-०१४७ दिनांक १८/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संयुक्त समिती गठीत करण्यात आली असून, संस्था/तज्ज्ञांच्या सहभागाने चंद्रपूरसाठी आरोग्य परिणाम मूल्यांकन अभ्यास (Health Impact Assessment Study) करून घेण्याची कार्यवाही करावी व या अभ्यासाच्या निष्कर्षांच्या आधारे पीडितांना दिलासा देण्यासाठी तसेच संबंधित क्षेत्रातील आरोग्य

सुधारण्यासाठी एक सुसंगत योजना तयार करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात प्लास्टिकचा वापर पुर्णत: बंद करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१६) ३४४१ (१७-०७-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व प्रमुख शहरांमध्ये ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिकचा वापर होत असून शहरातील रस्त्यांवर ढिगाऱ्यांमध्ये प्रतिबंधीत प्लास्टिक दिसून येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्नाच्या शोधात असलेल्या जनावरांचे आरोग्य यामुळे धोक्यात आले असून राज्य शासनाने ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशवीवर बंदी घातली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्लास्टिकचा वापर बंदी असतानाही बंद झालेला नाही व सर्रास प्लास्टि क पिशव्यांचा वापर होत असून जागोजागी पडून असलेल्या कचऱ्यात सर्वाधिक प्लास्टिक दिसून येते त्यामुळे हा कचरा नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात साठला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०९-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) शासनाने ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशवीवर बंदी घातली आहे.
(३) हे अंशत: खरे नाही.
(४) महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा २००६ अंतर्गत प्लास्टिक आणि थर्माकॉल इत्यादीपासून बनवलेल्या अविघटनशील वस्तुंचे नियमन करण्यासाठी महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकॉल अविघटनशील वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवणूक) अधिसूचना २०१८, दिनांक २३/०३/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुषंगाने दिनांक ११/०४/२०१८, ३०/०६/२०१८, १४/०६/२०१९, २८/०३/२०२२, १५/०७/२०२२ आणि दिनांक ३०/११/२०२२ अन्वये एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधित करण्याकरीता विविध सुधारणा करण्यात आल्या आहेत. सदर अधिसूचनेच्या अंमलबजावणी करीता स्थानिक स्वराज्य संस्था व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या प्रतिनिधी समवेत विविध विक्रेते व आस्थापनांना वेळोवेळी भेटी देऊन एकल वापर प्लास्टीक विक्री व वापराबाबत पाहणी केली जाते व पाणी दरम्यान आढळून आलेल्या दोषींवर दंडात्मक कारवाई कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भाईदर पूर्व (जि.ठाणे) येथील इंद्रलोक हाईटस सोसायटीतील रहिवाशांचे आरोग्य मार्बल आणि ग्रॅनाईट कारखान्यांच्या प्रदूषणामुळे धोक्यात आल्याबाबत

**(१७) ३५१० (१७-०७-२०२५) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईदर पूर्व (जि.ठाणे) येथील इंद्रलोक हाईटस सोसायटीतील रहिवाशांचे आरोग्य मागील पाच वर्षांपासून या परिसरात असलेल्या मार्बल आणि ग्रॅनाईट कारखान्यांच्या ध्वनी व वायू प्रदूषणामुळे धोक्यात आले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा मीरा-भाईदर पोलीस ठाण्यात व महानगरपालिकेत तक्रार दाखल केली असून सदर कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.

आरोग्य अधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इंद्रलोक हाईट्स सोसायटी, भाईंदर (पू.) येथील परिसरात ध्वनी व वायू प्रदूषणामुळे रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही, तसेच याबाबत स्थानिक नागरीकांची कोणतीही तक्रार सार्वजनिक आरोग्य विभागाकडे प्राप्त झालेली नाही.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रश्नाधिन परिसरातील प्रत्यक्ष करण्यात आलेल्या पाहणी दरम्यान १०० ते १२० फुटाच्या अंतरावर ३ मार्बल/ग्रॅनाइट विक्री, कटींग व पॉलिशिंग आस्थापने अस्तित्वात असल्याचे आढळून आले. तसेच, सदर उद्योगांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र घेतले नसल्याने व पुरेशी प्रदूषण नियंत्रण व्यवस्था बसविलेली नसल्याने मंडळाने दिनांक १४/०८/२०२५ रोजी कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आली. तद्नंतर दिनांक २९/०९/२०२५ रोजी सदर उद्योग बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे येथील शासकीय विश्रामगृह बेहिशोबी रोख रक्कम पोलिसांनी जप्त केल्याबाबत

**(१८) ३८७८ (१८-०७-२०२५) श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील गुलमोहोर शासकीय विश्रामगृहातील कक्ष क्र. १०२ मध्ये १ कोटी ८४ हजार २०० रुपयांची रक्कम पोलिसांनी जप्त केली असल्याची बाब दिनांक २१ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधिताविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) धुळे येथील शासकीय विश्राम गृहात कक्ष क्र.१०२ मध्ये दिनांक २१ मे, २०२५ रोजी तपासणी केली असता रुपये १,८४,८४,२००/- इतकी बेहिशोबी रोख रक्कम मिळुन आल्याने ती जप्त करुन कोषागार कार्यालय धुळे येथे जमा करण्यात आली आहे.

सदर प्रकरणाचा तपास सुरु असून पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा., धुळे यांनी तपासादरम्यान एकूण तीन आरोपी नामे

१. किशोर काशिनाथ पाटील

२. राजकुमार व्यंकटराव मोगले

३. गौतम नारायण वाघमारे

यांनी सदरची रोख रक्कम लबाडीच्या इरादयाने संपादीत केल्याची शक्यता असल्याने व सदरची रक्कम निश्चित कोणाची आहे हे स्पष्ट होत नसल्याने त्याबाबत प्राथमिक चौकशी करणे आवश्यक असल्याने भा.ना.सु.सं.कलम १७३ (३) प्रमाणे चौकशी करुन धुळे शहर पोलीस स्टेशन येथे अदखलपात्र गु.र.नं. २६४/२०२५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १२४ प्रमाणे ३१/०५/२०२५ रोजी दाखल करुन पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी, धुळे शहर उपविभाग, धुळे यांना देण्यात आला आहे.

तीनही आरोपींनी अद्यापपर्यंत सदर गुन्ह्यात मदत होईल असे काहीएक सांगीतलेले नाही तसेच सदरची बेहिशोबी रोख रक्कम कोणी दिले अथवा कसे आले याबाबतही काहीएक माहिती नाही असे सांगितले आहे.

गुलमोहर विश्रामगृहातील सी.सी.टी.व्हि. फुटेज वरुन दिसत असलेल्या तीन वाहनांची पडताळणी करण्यात आली आहे. तसेच धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील विविध शासकीय विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे चौकशी करण्यात आली आहे.

गुलमोहर विश्रामगृह येथील मोबाईल डमडाटा घेवुन संशयीतांच्या मोबाईनची CDR/SDR घेवुन त्याचे विश्लेषण करुन तपास सुरु आहे.

सदर प्रकरणी माजी आमदार श्री.अनिल उमराव गाटे यांनी मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, धुळे न्यायालयात दाखल केलेल्या अर्जास अनुसरुन मा.न्यायालयाने भा.ना.सु.सं. २०२३ चे कलम १७५(३) नुसार आरोपी १) किशोर काशीनाथ पाटील व आरोपी २) राजकुमार व्यंकटराव मोगले यांच्याविरुध्द भा.न्या.सं.कलम ३०८, ६१(२), २३३, २३८, २३९, २४०, २४१, २४९ अन्वये गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिल्याने दिनांक ११/०७/२०२५ रोजी धुळे शहर पो.स्टे. येथे गु.र.नं.२२६/२०२५ मध्ये उक्त कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात आरोपी किशोर काशिनाथ पाटील यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपिठ औरगांबाद येथे क्रिमीनल रिट पिटीशन क्र.१०२६/२०२५ अन्वये दाखल केल्याने मा.न्यायालयाने त्यावर पुढील तारखेपावेतो स्थगिती दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील पशुधनाचे चोरीस आळा घालणेबाबत

**(१९) ३९८४ (१८-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात मागील २ वर्षांमध्ये शेतकऱ्यांचे पशुधन चोरीस जाण्याचे प्रमाण वाढले असून, सुमारे २१७ पशुधन चोरीच्या घटना घडल्याचे दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजीच्या आकडेवारीवरून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पशुधन चोरणाऱ्यांवर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने चोरीस आळा घालण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने पशुधन चोरीस आळा घालणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०२५) :** (१) नाही, हे खरे नाही.

जळगाव जिल्हा घटकात शेतकऱ्यांचे पशुधन चोरीस जाण्याचे प्रमाणात वाढ झालेली नाही.
(२) हे खरे नाही,

जळगाव जिल्ह्यातील पशुधन चोरीच्या तक्रारी प्राप्त होताच लागलीच गुन्हा दाखल करण्यात येत असून गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेणे तसेच चोरीस गेलेल्या पशुधन हस्तगत करण्याकरीता प्रयत्न करण्यात येतात.

सन २०२५ च्या जुलै अखेर गुरे चोरीचे एकूण ४३ गुन्हे दाखल असून त्यापैकी १० गुन्हे उघडकीस आणले आहे. तसेच सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये सदरच्या गुन्ह्यांच्या प्रमाणात घट झालेली आहे.
(३) सदर प्रकारच्या गुन्ह्यांबाबत चौकशी करुन गुन्ह्यातील आरोपींना अटक करुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. तसेच त्यांच्यावर कडक प्रतिबंधक कारवाई देखीलकरण्यात येत आहे.

जिल्हा घटकात नियमितपणे नाकाबंदीचे आयोजन करण्यात येत आहे. कोंम्बिंग ऑपरेशन आयोजित करुन पशुधन चोरी करणारे आरोपींची पडताळणी करण्यात येत आहे. तसेच गावपातळीवर ग्राम सुरक्षा दल स्थापन करुन सदर प्रकारच्या गुन्ह्यांना आळा घालण्याकामी प्रयत्न करण्यात येत आहे.

पोलीस स्टेशन पातळीवर रात्रगस्त, पेट्रोलिंग मध्ये वाढ करुन पशुधन चोरीच्या घटनांना आळा बसावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.
(४) विलंब नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील गाडेगावजवळ सशस्त्र दरोडेखोर हल्ला करीत असल्याबाबत

**(२०) ३९८८ (१८-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव ते छत्रपती संभाजीनगर राज्य महामार्गावरील गाडेगावाजवळ सशस्त्र दरोडेखोर वाहनांवर दगडफेक करुन वाहनांची लुट करीत असल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असल्याची बाब दिनांक २१ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने पोलीस गस्त वाढविणे, दरोडेखोरांवर कारवाई करणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २१/०४/२०२५ रोजी रात्री पहुर ते जळगाव रोडवर गाडेगाव गावाच्या पुढे काही अंतरावर फिर्यादी व त्यांच्यासोबतचे सहकारी यांच्या बोलेरो पिकअप गाडीवर अनोळखी इसमांनी दगड फेकुन समोरील काचेचे नुकसान केल्याच्या फिर्यादीवरुन जामनेर पोलीस स्टेशन येथे CCTNS No. १५८/२०२५ BNS १८९(२), १२५, ३२४(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) सदर घटनेसंदर्भात उक्त प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हातील अनोळखी आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

जळगाव जिल्हा घटकात गुन्ह्यांना आळा घालण्याकरीता नियमितपणे नाकाबंदीचे आयोजन करण्यात येत आहे. कोंम्बिंग ऑपरेशन करुन अभिलेख्यावरील आरोपींना चेक करण्यात येत आहे. तसेच पोलीस स्टेशन पातळीवर रात्रगस्त, पेट्रोलिंग मध्ये वाढ करुन अशाप्रकारच्या घटनांना आळा बसावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.
(३) विलंब नाही.

---

**विधान भवन :** **डॉ.विलास आठवले**
**नागपूर.** **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.